# शुभकामना बँक

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाद्वारे दिनांक ते २०१० या कालावधीत 'शंभर कोटी मिनिटांची शुभकामना बँक' या नावाचा एक विश्वस्तरीय कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमाअंतर्गत दिवसभरात कमीत कमी ११ मिनिटांसाठी शुभकामना या बँकेत जमा करायच्या आहेत. त्यासाठी एक शुभकामना कार्ड प्रत्येक सदस्याला देण्यात येईल. त्यात दररोज आपण किती मिनिटांसाठी शुभकामना जमा केल्या त्याची नोंद करायची आहे. शुभकामना कार्ड कोणत्याही जवळच्या सेवाकेंद्रावरून आपल्याला प्राप्त होऊ शकेल. वेबसाईटवर (www. goodwishesbank.net) वर देखील ते उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्ती तेथेही हे कार्ड भरू शकतात. सदरचे कार्ड रोज नियमित भरून १५ ऑगस्ट रोजी सेवा केंद्रावर जमा करावे. त्यानंतर ती संस्थेचे मुख्यालय मधुबनला पाठविण्यात येईल. तेथून २५ ऑगस्ट २०१० पर्यंत एकत्रित रिपोर्ट संयुक्त राष्ट्रसंघ (UNO) कडे सादर केला जाईल. (विशेष म्हणजे २५ ऑगस्ट २०१० रोजी आदरणीय दादी प्रकाशमणीजींचा तिसरा वर्ष दिव्य स्मृतीदिवस आहे.) म्हणून या कार्यक्रमात प्रत्येक ब्रह्मवत्साने आवश्य भाग घ्यावा तसेच किमान इतर व्यक्तींना या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी प्रेरित करावे.

आपण हे जाणतोच की शुभकामना ही शक्तिशाली औषधी आहे, जिच्यामुळे अनेक व्याधी, समस्या व चिंता यातून मुक्तता होते. समय तसेच दूरवरचे अंतर यांचा प्रभाव या शक्तींवर पडत नाही. शुभकामना या कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही वेळी दिल्या जाऊ शकतात. तसेच त्या विशिष्ट व्यक्तींपर्यंत जरूर पोहोचतात. मग ती व्यक्ती सन्मुख असो वा हजारो मैल दूर असो. अशाप्रकारे एक दुसऱ्याला शुभभावना, शुभकामना देण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करूया. त्यासाठी मनात कसे चिंतन करावे याची कॉमेंट्रीदेखील नमुन्यादाखल देण्यात आली आहे.

(काही मिनिटे शांत स्थितीत बसल्यानंतर पुढील चिंतन करावे.)

'मी ज्योतिर्बिंदू आत्मा आहे, मी आत्मा शक्ती संपन्न आहे. सर्व शक्तिवान पित्याकडून येणारी शक्तीची किरणे मला संपूर्ण बनवित आहेत. मी स्वस्त बनत आहे. मी शांत बनत आहे. मी शक्तिशाली बनत आहे. सर्व आत्म्ये खूप चांगले आहेत. सर्व परमात्म्याच्या छत्रछायेत आहेत. सर्वजण स्वस्थ बनत आहेत. शांत बनत आहेत. शक्तिशाली बनत आहेत. सर्वांचे जीवन सुखी बनत आहे.

प्रकृतीदेखील सहयोग प्रदान करीत आहे. प्रकृतीसुद्धा पावन बनत आहे. आतापर्यंत जे झाले ते माझ्यासाठी चांगले झाले, जे होत आहे तेही चांगलेच आहे व जे होणार आहे ते खूपच चांगे असेल.'

गीत :- दिल से देते चलो दुआएँ

सब का भला हो

सब सुख पाये ।

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com